CNRNOMHYA050012202025

**निकालपत्र**

**(घोषीत तारीख ०७/०४/२०२६)**

**सरकार विरुद्ध मजर खान जफरउल्लाहा खान**

१. अभिलेखावर आलेल्या पुराव्याचे अवलोकन केले असता, माझे समोर खालील प्रश्न उपस्थित होतो, त्यास खालील कारणांसह निष्कर्ष नोंदवित आहे.

| अ.क्र. | प्रश्न | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | अभियोगपक्षाने असे शाबीत केले का की, दिनांक ३१/१०/२०२२ रोजी रात्री ३.०० वाजण्याच्या सुमारास मस्तान चौक, गडीवार्ड पुसद येथे तुम्ही सार्वजनिक ठिकाणी पैशाची बाजी लावून, मोबाईल फोनवर तसेच चिटटीवर वरळी मटका नावाचा बेकायदेशीर जुगार खेळताना व खेळविताना मिळून आला आणि त्याद्वारे आरोपी यांनी मुंबई जुगार प्रतिबंधक कायदा कलम ४ व ५ सह कलम १०९ भा.दं.वि. नुसार अपराध केला? | **नाही.** |
| २. | काय आदेश? | **आरोपी यांची निर्दोष मुक्त करण्यात येते.** |

## कारणमिमांसा

**प्रश्न क्रमांक १ साठी**–

२. आरोपीविरुद्धचा गुन्हा सिद्ध करण्यासाठी अभियोगपक्षाने केवळ 'एकाच' साक्षीदारांची साक्ष नोंदविली. अभियोगपक्षातर्फे साक्षीदार क्रमांक–१ **राहुल मारोती गाडे** यांची साक्ष ***निशाणी क्रमांक–७*** वर नोंदविण्यात आली. अभियोगपक्षास वारंवार संधी देऊनही त्यांनी फिर्यादी, इतर स्वतंत्र प्रत्यक्षदर्शी व पंच, तपासी अधिकारी या साक्षीदारांची साक्ष घेतली नाही. अभियोगपक्षाने त्यांचा पुरावा ***निशाणी क्रमांक–१*** प्रमाणे बंद केला. आरोपीतर्फे कोणीही साक्षीदार तपासले नाही.

३. अभियोगपक्षातर्फे साक्षीदार क्रमांक–१ **राहुल मारोती गाडे** यांची साक्ष ***निशाणी क्रमांक–७*** वर नोंदविली आहे. ते घटनास्थळ/जप्ती पंचनाम्यावरील 'पंच साक्षीदार' असून, त्यांनी साक्षीदरम्यान कथन केले की, त्यांना पोलीसांनी घटनास्थळ व जप्ती पंचनामा करण्यासाठी बोलावले नव्हते व पोलीसांनी त्यांच्यासमक्ष काहीही जप्त केले नाही. त्यांनी पंचनाम्यातील मजकूर खरा नसल्याचे कथन केले व त्यावरील त्यांची फक्त सही मान्य केली. त्यामुळे सदर साक्षीदार यांना सहाय्यक सरकारी अभियोक्ता यांनी भारतीय पुरावा कायदा कलम १५४ अन्वये त्यांना उलटतपासात विचारता येतील असे

'सूचक प्रश्न' विचारण्यास परवानगी देण्यात आली. परंतु, उलटतपासातही उपरोक्त साक्षीदार यांच्या साक्षीतून घटनेच्यादिवशी, वेळी व ठिकाणी आरोपी हा दोषारोपात नमूद केल्याप्रमाणे मस्तान चौक, गडीवार्ड पुसद येथे सार्वजनिक ठिकाणी वरळी मटका नावाचा बेकायदेशीर जुगार खेळताना व खेळविताना मिळून आले होते असे काहीही अभियोगपक्षास निष्पन्न करता आले नाही. त्यामुळे अभियोगपक्ष घटनास्थळ/जप्ती पंचनामा सिद्ध करु शकला नाही.

४. अभियोगपक्षास वारंवार संधी देवूनही अभियोगपक्ष फिर्यादी, इतर स्वतंत्र व पंच साक्षीदार किंवा तपासी अंमलदार यांना तपासु शकले नाही. या व्यतिरीक्त जप्त मुद्देमाल घटनेच्या दिवशी, वेळी व ठिकाणी आरोपी यांच्या ताब्यातून जप्त करण्यात आला असे दाखवणारा कुठलाही पुरावा अभिलेखावर नाही. त्यामुळे अभियोगपक्षाने प्रस्तुतची केस सामान्य बुध्दीच्या संशयापलीकडे सिद्ध केली नाही. सबब, आरोपीविरुद्ध मुंबई जुगार प्रतिबंधक कायदा कलम ४ व ५ सह कलम १०९ भा.दं.वि. अन्वये गुन्हा केला हे सिध्द करणारा सबळ पुरावा न्यायालयासमोर आलेला नाही. परिणामतः आरोपीला निर्दोष मुक्त करण्यात येते. वरील कारणास्तव मी प्रश्न क्रमांक–१ चे उत्तर **नकारार्थी** देत आहे.

**प्रश्न क्रमांक २ साठी**–

५ . वरील सर्व साक्षी पुराव्याचे अवलोकन केले असता व प्रश्नांचे निष्कर्ष विचारात घेतले असता, अभियोगपक्ष आरोपी विरुध्दचे दोषारोप सबळ पुराव्याद्वारे सिध्द करु शकला नाही. परिणामतः आरोपी हा निर्दोष मुक्ततेस पात्र आहे. सबब, मी प्रश्न क्रमांक–२ चे निष्कर्षाकरीता खालील आदेश पारित करीत आहे.

| आदेश | |
|---|---|
| १. | फौजदारी प्रक्रिया संहिता १७९३ चे कलम २५५(१) अन्वये आरोपी क्र. १ **मजर खान जफरउल्लाहा खान** रा. गडीवार्ड पुसद ता. पुसद जि. यवतमाळ व आरोपी क्र. २ **प्रशांत कमलाकर रोकडे** रा.माळीपुरा, पुसद यांची मुंबई जुगार प्रतिबंधक कायदा कलम ४ व ५ सह कलम १०९ भा.दं.वि. अन्वये ठेवलेल्या अपराधातून निर्दोष मुक्तता करण्यात येत आहे. |
| २. | प्रस्तुत गुन्ह्यातील जप्त मुद्देमाल वरळी मटके आकडे लिहीलेले १२ नग छोटे पान, दोन बॉल पेन, दोन खरडे, वरळी मटक्याचे आकडे लिहीलेले हिशोबाचे २ बुक हे मूल्यहीन असल्याने ते अपिल कालावधी नंतर कायदेशीर प्रक्रियेचा अवलंब करून नाश करावे. |
| ३. | प्रस्तुत गुन्ह्यातील जप्त मुद्देमाल एकुण सहा मोबाईल त्यांच्या मालकी हक्काबाबत पडताळणी करून अपील कालावधीनंतर मुळ मालकास हस्तांतरीत करण्यात यावे. |

**निशाणी क्रमांक–**

| | |
|---|---|
| **४.** | जप्त मुद्देमाल एक ड्रेव्हा कंपनीचे कॅलक्युलेटर याचा अपील कालावधीनंतर लिलाव करून मिळणारी रक्कम सरकारजमा करण्यात यावी. |
| **५.** | आरोपी यांचे वैयक्तिक बंधपत्र व जामीनपत्र रद्द करण्यात येत आहे. |
| **६.** | आरोपी यांनी फौजदारी प्रक्रिया संहिता १९७३ चे कलम ४३७–अ अन्वये वरिष्ठ न्यायालयात अपिल अथवा इतर अर्ज दाखल झाल्यास हजर राहणेसाठी म्हणून प्रत्येकी रक्कम रुपये १५,०००/–(पंधरा हजार रुपये मात्र) चे वैयक्तीक बंधपत्र व जामीनपत्र या न्यायालयात दाखल करावे. सदर जामीनपत्राची मुदत ६ महिने राहिल. |
| | **(न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात जाहीर केला)** |

sd/–

**(श्रीमती व्ही.डी.बिरहारी)**

प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी,पुसद (न्यायालय क्र.२)

दिनांक ०७/०४/२०२६ ता. पुसद, जि. यवतमाळ.